एल.ए.आर. ग्रुप क्र.१३/२०१९
२०/२०१९, २२/१९ २५/१९,
२७/१९, २८/१९, २९/१९,
३१/१९ व ३२/१९
नि.क्र.२५/ क (सोबत)

अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.१

**उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री. के.व्ही. पंढरीकर यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

१. १९७२ साली दुष्काळ पडला त्यावेळी मी १५ वर्षाचा होतो. हे म्हणणे खरे नाही की, मला लगतच्या जमिनीच्या मालकाबाबत, त्यांच्या शेतातील पिकाबाबत, प्रतीबाबत काहीही माहिती नाही. श्रावण ढाले यांची सर्वे नं.२० मधील पश्चीम बाजुची १४ आर जमीन संपादित झालेली आहे. त्यांच्या जमिनीच्या उत्तरेला नाला आहे. पाशामिया देशमुख यांची सर्वे नं.१७ मधील १४ आर जमीन संपादित झालेली आहे. भाऊराव येवते यांची सर्वे नं.१९ मधील ९ आर जमीन संपादित झालेली आहे. सर्वे नं.१९ च्या ७/१२ वर १९९३ साली चार जणांची हिरालाल गोविंदराव येवते यांचे क्षेत्र १६ आर, सिद्राम साळुंके यांचे क्षेत्र १५ आर, भाऊराव व्यंकोबा येवते यांचे क्षेत्र ९ आर व बब्रुवान व्यंकोबा येवते यांचे क्षेत्र ११ आर जमीन होती. १९९३ सालचा सर्वे नं.१९ चा ७/१२ उतारा मी दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, १९९९ साली कॅनॉल करीता जमिनी संपादित झाल्यामुळे आमच्या गावातील जमिनी बागायती झाल्या. साक्षीदार सांगतो की, लोकांच्या जमिनीला पाणी मिळाले होते, परंतु माझ्या जमिनीचे नुकसान झाले होते.

२. इतर एल.ए.आर. प्रकरणातील जमीन धारकांनी मला साक्ष देण्याकरीता अधिकारपत्र करुन दिलेले आहे. सदर अधिकारपत्र मी दाखल करु शकतो. माझ्या जमिनीतून उत्पन्न मिळत असल्याबाबतच्या १९९९ सालच्या मालाच्या पावत्या माझ्याकडे नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, माझी बुध्दी तल्लक आहे. १९९९ सालापर्यंत मी माझ्या जमिनीत विहीर खोदलेली नाही. माझी जमीन संपादन होण्यापुर्वी त्यामध्ये मी जमीन सिंचनाकरीता पाईपलाईन करुन त्यावर मोटर बसविले होते. मी सदर कालावधीमधील लाईट बिल दाखल करु शकत नाही. मी १९९९ साली सुर्यफूल, ऊस, मिरची, भुईमूग इत्यादी पिके घेत असल्याबाबत माझ्याकडे कागदपत्री पुरावा मी दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी जमीन संपादित झाली असली तरी २००४-०५ साली मी फक्त रब्बी व खरीप पिके घेत होतो व माझी जमीन सिंचनाखाली आलेली नव्हती. मी दाखल केलेला नि.क्र.५२ वरील ७/१२ उतारा बरोबर असून त्यातील पिकाच्या नोंदी बरोबर आहेत. तसेच उर्वरीत १६ शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील नोंदी देखील बरोबर आहेत. हे म्हणणे खरे नाही की, हिरालाल येवते यांनी कोणाकडून किती रुपयास बोअर पाडले होते याबाबत मला वैयक्तीक माहिती नाही.

३. हे म्हणणे खरे नाही की, गजराबाई महालिंगे यांनी घेतलेली जमीन गावालगत गावठाण जमीन आहे. सदर खरेदीखतामध्ये खरेदी मिळकतीच्या दक्षिण बाजूस गावठाण असल्याचे नमूद असून ते बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, गजराबाई महालिंगे यांचे दि.२/२/१९९३ चे दुसरे खरेदीखत हे तिच्या जमिनीलगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गजराबाई हिच्या जमिनीलगत सदर जमीन असल्यामुळे दुसऱ्या कोणाला जमीन जाऊ नये म्हणून जास्त भावाने जमीन खरेदी केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.२७ वरील खरेदीखत हे महाराष्ट्र शासन जमीन संपादित करणार असे नोटीस निघाल्यानंतर जास्त भाव

**एल.ए.आर. ग्रुप क्र.१३/२०१९**
२०/२०१९, २२/१९ २५/१९,
२७/१९, २८/१९, २९/१९,
३१/१९ व ३२/१९
नि.क्र.२५/ क (सोबत)

दर्शवून खरेदीखत करुन घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, गावालगत असलेल्या जमिनीचा भाव नेहमी जास्त असतो. फरद खुर्शीद देशमुख यांच्या जमिनीलगत डांबरी सरकारी रस्ता नाही. सरदारमिया देशमुख, महेमुद देशमुख यांच्या जमिनीलगत पुर्व बाजूला २० फुटाचा सरकारी रस्ता आहे. हिरालाल गोविंद येवते यांच्या जमिनीच्या पश्चीम बाजूला ५०-६० फुटाचा सरकारी रस्ता आहे. शकील, खादर, कैसर, पाशामिया, खुर्शीदमिया, सुभाष, युसूफ यांच्या जमिनीलगत सरकारी रस्ता नाही. शकील यांना एकुण ५ एकर जमीन आहे. मधुकर यांना एकुण ६ एकर जमीन असून त्याच्या जमिनीलगत ६० फुटाचा रस्ता आहे. सिद्राम, बब्रुवान, भाऊराव, रंगराव यांच्या जमिनीलगत ६० फुटाचा रस्ता आहे. मी गावनकाशा दाखल करु शकतो. मला एक मुलगा असून त्याला दोन मुले आहेत. त्याच्या थोरल्या मुलाचे जन्म तारीख १८/०४/२०१३ आहे व धाकट्या मुलाचे जन्म तारीख २३/१०/२०२३ आहे.

४. हे म्हणणे खरे आहे की, आवॉर्डची माहिती २००१ साली मिळाल्यानंतर वाढीव मावेजाची कार्यवाही आम्ही आवॉर्डमधील सर्व शेतकऱ्यांनी दि.२६/०८/२००४ रोजी दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेल्या खरेदीखतातील दर आमच्या जमिनीला लागू होत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आवॉर्डमधील सर्व शेतकऱ्यांची जमिनीची उगवण क्षमता वेगवेगळी आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे कोरडवाहू जमिनीकरीता रु.५६,०००/- व बागायती जमिनीकरीता रु.७५,०००/- प्रति हेक्टरी १९९९ साली शासनाने योग्य तो मावेजा दिलेला आहे.

५. हे म्हणणे खरे नाही की, मला ऑवर्डिमधील कोणत्याही शेतकऱ्यांची मला वैयक्तीक माहिती नसताना मी पाठांतराच्या जोरावर सदर साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे पिकाच्या उत्पन्नाचे बिल व लाईट बिल नसताना शासनाकडून मला जास्तीचा मावेजा मिळण्याकरीता मी स्वतःसाठी व इतर लगत धारकांसाठी खोटे शपथपत्र दाखल केले आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by
BHOSALE VRINDA
DHANANJAY
Date: 2025.10.29
17:23:57 +0530

दि.२९/१०/२०२५

**(श्रीमती. व्ही. डी. भोसले)**
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, निलंगा.